प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाचे नाव आर्य ठोके

नाशिक । पहिलीपासूनच मोटर न्यूरॉन डिसीज या दुर्मीळ आजाराने ग्रासल्याने ज्याला शाळेत जाणे शक्य झाले नाही. संकटे माणसाला खचवतात, पण काही व्यक्ती त्यांच्यावर मात करून आश्चर्यचकित करणारी यशोगाथा लिहितात. अशाच एका विद्यार्थ्याने स्वतः अभ्यास करुन दहावीत ९६ टक्के गुण मिळवून एक आदर्श निर्माण केला आहे.

आर्य योगेश ठोके असे या विद्यार्थ्यांचे नाव आहे. आर्यला स्पाइनल मस्कुलर ट्रॉफी या दुर्धर आजाराने ग्रासले होते. पहिलीपासूनच त्याला या आजाराची लक्षणे दिसू लागली. त्यामुळे रवींद्रनाथ विद्यालयात जाणेही त्याला शक्य झाले नाही, घरीच आई, वडील अभ्यास घेऊ लागले. शिक्षक मदत करु लागले. एवढा आजारी असूनही आर्यची बौध्दिक क्षमता मात्र तसूरभरही कमी झाली नाही. तो दरवर्षी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊ लागला. दहावीनंतर त्याने घरी बसूनच अभ्यास केला. विज्ञान, गणित, संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळवले. मंगळवारी दहावीचा निकाल हाती आल्यानंतर त्याला ९६ टक्के गुण मिळालेले पाहताच आई सुप्रिया, वडील योगेश ठोके यांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. आनंदाश्रुंनी मातेचे मन भारावून गेले होते.

याबाबत योगेश ठोके म्हणाले की, आर्य आजारी असला तरी त्यांची बौध्दिक क्षमता कमालीची तीक्ष्ण आहे. स्वतः अभ्यास करुन त्याने हे देदीप्यमान यश संपादन केले आहे. त्याला भविष्यात भौतिकशास्त्रात संशोधन करण्याची इच्छा आहे. त्यात तो निश्चित यश मिळवेल, अशी खात्री आहे.



मोटर न्यूरॉन डिसीज आजाराविषयी...

व्हीलचेअरशिवाय एक पाऊलही पुढे जाऊ शकत नाही, अशा परिस्थितीत पृथ्वीच्या उत्पत्ती सिद्धांत मांडणारे फिजिसिस्ट प्रोफेसर स्टीफन हॉकिंग यांना हाच मोटर न्यूरॉन डिसीज होता. या आजारात मेंदूपासून संपूर्ण शरीरात स्नायूंना सिग्नल प्रसारित करण्यासाठी पेशींचा ऱ्हास होतो. स्नायू कमकुवत होतात आणि त्यावर ताण येतो, बोलताना आणि गिळताना त्रास होतो आणि अर्धांगवायू यांसारखी लक्षणे दिसून येतात. याचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे. अनुवांशिक आणि पर्यावरणीय घटक या स्थितीस कारणीभूत ठरतात. बहुतेक लोकांना चाळीशीनंतर लक्षणे दिसू लागतात आणि ५० ते ७० वर्षे वयोगटातील लोकांमध्ये मोटर न्यूरॉन डिसीज सर्वात सामान्यपणे आढळून येतो.आता मोटर न्यूरॉन डिसीजवर उपचार करण्यासाठी अभिनव पध्दती विकसित झाल्या आहेत. आर्यसाठी तो आशेचा किरण ठरो, हीच सदिच्छा.

जिद्द अन् मेहनतीचा विजय

या आजारामुळे त्याला शाळेत प्रत्यक्ष जाणे शक्य झाले नाही. पण त्याने शिक्षणासाठीची आस कधीच सोडली नाही. ज्या वयात बहुतांश विद्यार्थी शिकण्यासाठी शाळेवर अवलंबून असतात, त्या वयात आर्याने घरातूनच आत्मविश्वासाने आणि सातत्याने अभ्यास करून हे यश संपादन केले. या यशामागे आर्यची मेहनत तर आहेच, पण त्याहूनही अधिक मोलाची भूमिका आहे त्याच्या आई सुप्रिया यांची आणि आजीची. त्यांनी दिवसरात्र झटत, मुलाच्या प्रत्येक गरजेची काळजी घेत, त्याला शिक्षणात मागे पडू दिले नाही. आर्यच्या आजीनेही आपल्या नातवासाठी प्रेमाने, संयमाने आणि मायेने त्याला आधार दिला. आर्यच्या यशामुळे संपूर्ण कुटुंबाला अभिमान वाटतो आहे. त्याच्या जिद्दीपुढे आजारही हरला. हे यश केवळ गुणांचे नाही, तर माणसाच्या आत्मबलाचे, चिकाटीचे आणि कुटुंबाच्या समर्पणाचे प्रतीक आहे.

–योगेश ठोके, आर्यचे वडील

नांदूरमध्यमेश्वर पक्षी अभयारण्यात वन्यप्राणी गणना

नाशिक । प्रतिनिधी



महाराष्ट्रातील पहिली रामसर दर्जा मिळालेल्या नांदूरमध्यमेश्वर वन्यजीव अभयारण्यात बुद्ध पौर्णिमेनिमित्त वन्यप्राणी गणना करण्यात आली. यावेळी प्रथमच अभयारण्य परिसरात जंगली सश्याचे दर्शन झाले.

बुद्ध पौर्णिमेला वन्य प्राणी गणना करणे हे एका विशिष्ट पारंपरिक कार्य आहे. या दिवशी, उन्हाळ्यातील चंद्रप्रकाश जास्त असल्यामुळे आणि जंगलातील पाणी कमी झाल्यामुळे प्राणी पाणी पिण्यासाठी एकत्र येतात. या संधीचा उपयोग करून वन विभागाकडून वन्यप्राणी गणना केली जाते. गेल्या दोन दिवसांपासून अभयारण्य परिसरात मुसळधार पाऊस पडत असल्याने वन्यप्राणी गणनेत अडचणी निर्माण झाल्या. तरी देखील पक्षिमित्र, वन कर्मचारी यांनी विविध मचानीवर बसून प्राणी गणना केली. पक्ष्यांचे विविध आवाज, वटवाघूळ, नाईट जार, नाईट हेरॉन आदी पक्षी आणि सस्तन प्राणी यात सापडले. घोणस आणि पान सर्पचे देखील दर्शन झाले. वातावरण बदलामुळे गेल्या आठ दिवसात अभयारण्यात अनेक नवीन पक्षी पहावयास मिळाले होते. प्राणी गणनेमध्ये सहायक वन संरक्षक हेमंत उबाळे,वनपाल संदीप काळे, वन रक्षक अशा वानखेडे,नेचर क्लब ऑफ नाशिकचे अध्यक्ष प्रा.आनंद बोरा, डॉ.अनिल माळी, उमेशकुमार नागरे, अनंत सरोदे, गंगाधर आघाव, प्रमोद दराडे, अमोल दराडे, रोषण पोटे, विकास गारे, रोहित मोगल, पंकज चव्हाण, आदींसह वन कर्मचारी, विद्यार्थी सहभागी झाले होते.

बसवंत गार्डनचा कृषी पर्यटन महोत्सव

नाशिक । आनंदी जीवनशैलीच्या दृष्टिकोनातून कृषी संस्कृतीचे महत्त्व सांगणारा 'बसवंत कृषी पर्यटन महोत्सव' उद्यापासून (दि.१५) ३१ मे पर्यंत बसवंत गार्डन, मुखेडरोड, पिंपळगाव बसवंत येथे आयोजित करण्यात आला आहे.

१६ मे जागतिक कृषी पर्यटन दिन तर २० मे रोजी जागतिक मधमाशी दिन साजरा केला जातो. या दोन्ही दिवसांचे औचित्य साधून विविध उपक्रम साजरे होणार आहेत. भारतातील पहिल्या आणि वैशिष्ट्यपूण बसवंत ॲपी टुरिझम सेंटर व बसवंत गार्डनमध्ये विविध सृष्टिकेंद्री उपक्रम आयोजित करून, समाजामध्ये कृषी पर्यटनाबरोबरच मधमाशी पालनाला प्रोत्साहन देण्यासाठी ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि. सदैव प्रयत्नशील असते. दि. १६ ते २१ मे दरम्यान मिलांज आंबा महोत्सवही साजरा करण्यात येणार आहे. उत्कृष्ट आंबा उत्पादकांना मिलांज महाराजा (हापूस), मिलांज महाराजा (केशर) या विशेष पुरस्कारांबरोबरच इतर पाच स्वतंत्र बक्षिसेही देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. महोत्सवात बसवंत मधमाशी उद्यान, ग्रामसंस्कृती विभाग, आदर्श गाव – सेवरगांव, गोमाता संस्कृती, बैल संस्कृती, फळे– भाजीपाला–मध प्रक्रिया युनिट, चॉकलेट फॅक्टरी, जानोरी फ्लॉवर्स विभाग, बनी व्हिलेज, ॲक्वामीन– ॲक्वा टुरिझम, ग्रेपसिटी– ग्रेप टुरिझम तसेच गेम झोनला भेट देण्याची संधी मिळणार आहे. बसवंत कृषी पर्यटन महोत्सवाला जास्तीत जास्त पर्यटकांनी भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

धोरणात्मक उपक्रमांमुळे गोव्यात वाढले पर्यटक

पणजी । गोवा पर्यटन हंगाम २०२५ च्या पहिल्या तिमाहीत पर्यटकांच्या आगमन संख्येत दरवर्षीपेक्षा १०.५% वाढ दिसून आली आहे. वाढीच्या केंद्रस्थानी गोवा सरकारच्या पर्यटन विभागाची त्रि–स्तरीय रणनीती आहे.

मुख्य आणि उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये प्रमोशन मजबूत करणे, आंतरराष्ट्रीय हवाई कनेक्टिव्हिटीचा विस्तार करणे आणि पर्यटन सुविधांमध्ये विविधता आणणे अश्या धोरणात्मक उपक्रमांमुळे पर्यटक वाढल्याचे गोवा सरकारच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे

दोन अल्पवयीनांकडून तीन दुचाकी हस्तगत

नाशिक । प्रतिनिधी

गुन्हे शाखा युनिट १ च्या पथकाने सातपूर येथील मोतीवाला कॉलेज जवळून दोन विधी संघर्षित बालकांना सापळा रचून ताब्यात घेत त्यांच्याकडून चोरीच्या तीन मोटरसायकल हस्तगत केल्या.

गुन्हेशाखा युनिट ०१ कडील हवालदार नाझीमखान पठाण व अंमलदार अमोल कोष्टी यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक व्यक्ती हा चोरीच्या विना नंबर प्लेट असलेल्या ग्रे रंगाची ॲक्टिव्हा मोपेड मोटरसायकलसह मोतीवाला कॉलेज, ध्रुवनगर, सातपूर नाशिक येथे येणार आहे. त्यांनी ही बातमी गुन्हे शाखा युनिट एकचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांना देवून त्यांनी उपनिरीक्षक सुदाम सांगळे, हवालदार नाझीमखान पठाण, प्रशांत मरकड, प्रवीण वाघमारे, प्रदीप म्हसदे, संदीप भांड, अंमलदार विशाल देवरे, अमोल कोष्टी यांचे पथक तयार करून त्यांना मार्गदर्शन करून रवाना केले. या पथकाने शिवांश नाश्ता सेंटर, मोतीवाला कॉलेज, ध्रुवनगर, सातपूर, नाशिक येथे सापळा लावून मिळालेल्या बातमीप्रमाणे एका विधी संघर्षित बालकाच्या ताब्यात एक चोरीची ॲक्टिव्हा मोटरसायकल मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने अजून दोन मोटरसायकल नाशिक शहरातून चोरी केल्याची कबुली दिली. त्यास या मोटरसायकलबाबत विचारपूस केली असता त्याने या मोटरसायकल त्याचा मित्र विधीसंघर्षित बालक याच्या घरी लावल्याचे सांगितले. त्यानंतर वरील पथकाने दुसऱ्या विधीसंघर्षित बालक याच्या घरी जाऊन तेथून दोन मोटरसायकल हस्तगत केल्या आहेत. दोघा विधिसंघर्षित बालकांना गुन्हे शाखेच्या पथकाने पुढील तपास कमी सातपूर पोलिसांच्या ताब्यात दिले.

एम. बी. पाटील एज्युकेशनचा 'ॲडमिशन डे'

नाशिक । प्रतिनिधी

डॉक्टर व इंजिनिअर होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना भारतातील व परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेणे सुलभ होण्यासाठी नाशिकमध्ये एम. बी. पाटील एज्युकेशन पुणे या संस्थेच्या वतीने नाशिक येथील त्र्यंबक रोडच्या हॉटेल बीएलव्हीडी येथे उद्या (दि.१५) मेडिकल व इंजिनिअरिंग ॲडमिशन डे सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आला आहे.

प्रवेश घेणाऱ्या बऱ्याच विद्यार्थ्यांना व पालकांना प्रवेश प्रक्रियेबद्दल संपूर्ण माहिती नसते. पुरेशी व पूर्ण माहिती नसल्याने विद्यार्थ्यांना चांगले गुण मिळवून व परिस्थिती अनुकूल असतांनाही इच्छित शाखा किंवा कॉलेजमध्ये प्रवेश घेता येत नाही.

विद्यार्थी व पालकांच्या या अडचणींचा विचार करूनच पुणे येथील एम. बी. पाटील एज्युकेशन या संस्थेने पालकांच्या व विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार व सोयीसाठी या ॲडमिशन डे चे आयोजन केले आहे. या दिवशी संचालक मनोज पाटील व रशियातील विद्यापीठाचे प्रतिनिधी विद्यार्थी व पालकांच्या सर्व शंकाचे निरसन करून प्रवेशासाठी समुपदेशन व मार्गदर्शन करणार आहेत. परदेशात चांगल्या कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश घेण्यासाठी प्रवेश प्रक्रिया, तेथील राहण्याची, भोजनाची व्यवस्था, सुरक्षितता आदी बाबतही सहाय्य केले जाते. विद्यार्थी व पालकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

एम. एस.कोठारी अकॅडमी विद्यार्थ्यांचे यश

नाशिक । राज्य शैक्षणिक मंडळाच्या परीक्षेत एम. एस.कोठारी अकॅडमी व कनिष्ठ महाविद्यालयाच्या दहावीच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन करून शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली. ५३ पैकी ५१ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य प्राप्त केले. दोन विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. मुख्याध्यापिका सरिता देशपांडे, पर्यवेक्षिका वैशाली आठल्ये व शिक्षकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. नाशिक एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष दिलीप फडके, कार्यवाह राजेंद्र निकम, सहकार्यवाह शैलेश पाटोळे, कार्यकारी मंडळ सदस्य व शालेय समिती अध्यक्ष सचिन महाजन यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

आजचे कार्यक्रम

✻ स्व. पंडितराव खैरे स्मृती व्याख्यान

वक्ते :– ✻ श्री अभय भंडारी, व्याख्याते विटा, जि. सांगली

विषय :– ✻श्री शिवचरित्रातून आम्ही काय शिकलो ?

✻अक्षर काव्य समूह, नवी मुंबई प्रस्तुत – उत्सव कवितांचा ध्यास मराठीचा

पान १ वरुन..

मोसमी पाऊस अंदमानात

पुढील तीन ते चार दिवसात दक्षिण अरबी समुद्राचा काही भाग, मालदीव आणि कोमोरिन क्षेत्र; दक्षिण बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागात मान्सून दाखल होण्यास परिस्थिती अनुकूल असल्याची माहिती देखील भारतीय हवामान विभागाने दिली आहे.

देशभरात गेल्या पन्नास दिवसांपासून सुरु असलेल्या उष्णतेच्या लाटेमुळे वातावरणात मोठे बदल झाले आहेत. त्याचा परिणाम मान्सूनच्या आगमनावरही होणार अशी चिन्हे दिसत आहेत. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या प्राथमिक अंदाजानुसार, मान्सून यंदा नेहमीपेक्षा आठ ते दहा दिवस आधीच अंदमान– निकोबार बेटांवर पोहोचण्याची शक्यता असून १३ मेपर्यंत मान्सून अंदमानात दाखल होईल असा अंदाज भारतीय हवामान विभागाने यापूर्वी जाहीर केला होता. त्याप्रमाणे मंगळवारी मान्सूनचे अंदमानात आगमन झाले आहे.

ऐन उन्हाळ्यात अवकाळीचा मारा

राज्यभरात मागील काही दिवसांपासून अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. मंगळवारी (दि. १३) मुंबई, पुणे तसेच इतर काही जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस झाला. मुंबईसाठी आज आणि उद्या पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर ठाणे आणि मुंबईमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दक्षिण कोकणासाठीही यलो अलर्ट जारी करण्यात आला असून अहिल्यानगरसह कोल्हापूर,सातारा, सांगली, सोलापूर या जिल्ह्यांतील घाट भागातही पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

विदर्भातील पाच जिल्ह्यांसाठी हवामान विभागाच्या नागपूर प्रादेशिक केंद्राने बुधवार १४ मे आणि गुरुवार १५ मेसाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. गोंदिया, भंडारा, गडचिरोली, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये जोरदार अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पुढील दोन दिवस विदर्भातील आकाश ढगांनी आच्छादलेले राहील. बुधवारी आणि गुरुवारी काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता लक्षात घेता हवामान विभागाने गोंदिया, भंडारा, गडचिरोली, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

किरकोळ महागाई दरात घट

एप्रिलमध्ये आरोग्य महागाई दर ४.२५ टक्के होता, तर मार्चमध्ये तो ४.२६ टक्के होता. म्हणजे ते जवळजवळ सपाट राहिले आहे. याशिवाय, वाहतूक आणि दूरसंचार महागाई दर ३.७३ टक्के नोंदवला गेला आणि मार्च महिन्याच्या तुलनेत त्यात वाढ दिसून आली. मार्च २०२५ मध्ये हा आकडा ३.३६ टक्के होता. याशिवाय, इंधन आणि विजेच्या महागाईत मोठी वाढ झाली आहे आणि ती मार्चमध्ये १.४२ टक्क्यांवरून एप्रिलमध्ये २.९२ टक्क्यांपर्यंत वाढली आहे.

घरात घुसून मारू

आहे. भारतीय सैन्याने पाकिस्तानी सैन्याला हे देखील दाखवून दिले की पाकिस्तानमध्ये अशी कोणतीही जागा शिल्लक नाही जिथे दहशतवादी आरामात श्वास घेऊ शकतील. आम्ही घरात घुसून मारू आणि तुम्हाला पळून जाण्याची एकही संधी देणार नाही असा इशारा पाकिस्तानला देत मोदी पुढे म्हणाले की,आपले ड्रोन, आपली क्षेपणास्त्र ... त्यांच्याबद्दल फक्त विचार केल्याने पाकिस्तानची अनेक दिवसांची झोप उडून जाईल. भारत ही बुद्धांची भूमी आहे आणि गुरू गोविंद सिंहजी यांचीही भूमी आहे. गुरू गोविंद सिंहजी यांनी म्हटले होते की,'सवा लाख से एक लड़ाऊं, चिड़ियन ते मैं बाज तुड़ाऊं, तबै गुरु गोबिंद सिंह नाम कहाऊं वाईटाचा नाश करण्यासाठी आणि आपल्या धर्माच्या रक्षणासाठी शस्त्र उचलणे ही आपली परंपरा आहे. म्हणूनच जेव्हा आमच्या बहिणी आणि मुलींचे सिंदूर हिसकावून घेतले गेले, तेव्हा आम्ही दहशतवाद्यांच्या घरात घुसून त्यांना चोख उत्तर दिले आहे.

शोपियानमध्ये तीन दहशतवाद्यांचा खात्मा

हिरपोरा येथे भाजप सरपंचाच्या हत्येत त्याचा सहभाग होता. ३ फेब्रुवारी २०२५ रोजी कुलगाममधील बेहीबाग येथे झालेल्या टीए कर्मचाऱ्यांच्या हत्येतही त्याचा सहभाग असल्याचा संशय आहे. दुसऱ्या दहशतवाद्याची ओळख अदनान शफी दार अशी झाली आहे. तो शोपियानमधील वंदुना मेल्होरा येथील रहिवासी होता. तो २०२४ रोजी लष्करात सामील झाला. १८ ऑक्टोबर २०२४ रोजी शोपियानमधील वाची येथे एका मजुराच्या हत्येत तो सहभागी होता.

बांधकामात कृत्रिम वाळू बंधनकारक

असून धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र निरीक्षण यंत्रणा तयार केली जाणार आहे. राज्यातील बांधकाम क्षेत्रात या निर्णयामुळे मोठा बदल होण्याची शक्यता आहे.

खुल्लर समितीचा वेतनातील त्रुटी दूर करणारा अहवाल स्वीकृत

शासकीय कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या वेतनातील त्रूटी दूर करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या मुकेश खुल्लर समितीचा वेतनत्रुटी आणि अन्य शिफारशींबाबतचा अहवाल मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत स्वीकारण्यात आला. अधिकारी, कर्मचाऱ्यांना या शिफारशींचा प्रत्यक्ष आर्थिक लाभ याबाबतचे शासन आदेश ज्या महिन्यात काढण्यात येतील, त्या महिन्यापासून लागू होतील. मात्र १ जानेवारी २०१६ ते शासन आदेश काढण्यात येणाऱ्या महिन्यापर्यंतची कोणतीही थकबाकी दिली जाणार नाही, असे सरकारने स्पष्ट केले आहे. केंद्राच्या सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी राज्य शासकीय आणि इतर कर्मचाऱ्यांना १ जानेवारी २०१६ पासून लागू करण्यात आल्या आहेत. पण सुधारित वेतनश्रेणी लागू केल्यानंतर वेतननिश्चिती आणि सुधारित वेतनश्रेणी यांच्या अनुषंगाने काही त्रुटी आढळल्या होत्या. त्यावर राज्यातील शिक्षकांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सरकारने १६ मार्च २०२४ च्या शासन निर्णयाद्वारे मुकेश खुल्लर यांच्या अध्यक्षतेखाली वेतनत्रुटी समिती स्थापन केली होती. या समितीने विविध प्रशासकीय विभाग तसेच ५८ संघटनाशी चर्चा केली. या चर्चेअंती समितीने विविध संवर्गाचे प्रस्ताव तपासून ४४१ संवर्गांबाबत शिफारशी केल्या आहेत. या शिफारशींचा अहवाल ३१ डिसेंबर २०२४ रोजी शासनास सादर केला गेला. हा अहवाल आणि त्यातील शिफारशी आज मंत्रिमंडळ बैठकीत स्वीकारण्यात आल्या.

सावरकर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी बलकवडे

भगूर । वार्ताहर

भगूर येथील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक व ज्येष्ठ नगरसेवक दीपक बलकवडे यांची सर्वांमध्ये निवड करण्यात आली.

स्वा. विनायक दामोदर सावरकर जयंती सोहळा २०२५ या समितीची बैठक सेवानिवृत्त पोलीस उपविभागीय अधिकारी रमेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली श्रीराम मंदिर टेकडी, भगूर येथे झाली. त्यात २८ मे रोजी होणाऱ्या विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंती उत्सव सोहळ्याची पार्श्वभूमी सांगताना रमेश पवार यांनी खालीलप्रमाणे समिती घोषित केली. नूतन कार्यकारिणी अध्यक्षपदी ज्येष्ठ नगरसेवक दीपक बलकवडे, कार्याध्यक्ष वसंत पाटील, सरचिटणीस प्रशांत कापसे, खजिनदार राजेंद्र बागडे, समिती नियोजनप्रमुख अनिल पवार, विश्वस्त पोलीस उपायुक्त नवी मुंबई शामराव शिंदे, पोलीस उपायुक्त ठाणे शहर शेखर बागडे, पोलीस उपायुक्त ज्ञानेश्वर गणोरे, प्रादेशिक परिवहन अधिकारी नंदुरबार उत्तमराव जाधव, नाशिक लाचलुचपत विभाग वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल वालझाडे, आरटीओ नाशिक हेमंत हेंबाडे, उद्योजक उत्तमराव शिंदे, अवर सचिव मंत्रालय गजानन कातकाडे, अर्थसचिव मंत्रालय मंगेश बागडे, पोलीस उपनिरीक्षक नीलेश हेंबाडे, आदींची निवड करण्यात आली.

यावेळी सभेस रवींद्र येरम, चेतन बागडे, सुभाष जाधव, प्रकाश सुराणा, राजेंद्र जाधव, उत्तम आहेर, शाम भागवत, प्रमोद लासूरे, मनोज कुंवर, नीलेश हासे आदी मान्यवर व सावरकरप्रेमी उपस्थित होते. याप्रसंगी नवनिर्वाचित अध्यक्ष बलकवडे यांनी सांगितले की, भगूरपुत्र तात्याराव सावरकरांची जयंती २८ मे रोजी असून त्यानिमित्त समितीच्या वतीने व सर्वांच्या सहकार्याने विविध सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. भगूर पंचक्रोशीतील नागरिकांनी कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहनही बलकवडे यांनी केले. प्रास्ताविक अनिल पवार यांनी तर सूत्रसंचालन व आभार सरचिटणीस प्रशांत कापसे यांनी मानले.

नाशिकचे प्रभारी जिल्हाधिकारी केकाण

नाशिक । जिल्हाधिकारी जलज शर्मा हे आठ दिवसांच्या सुट्टीवर गेले असल्यामुळे मालेगावचे नाशिक जिल्हाधिकारी पदाचा पदभार मालेगावचे अपर जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपवला आहे.

विभागीय आयुक्त कार्यालयाकडून मंगळवारी (ता.१३) रात्री उशिरापर्यंत याबाबतचे आदेश काढण्याचे काम सुरू असल्याची माहिती सुत्रांनी दिली. पुढील ८ दिवसांसाठी नाशिकच्या जिल्हाधिकारी कार्यालयाचा कार्यभार मालेगावचे अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. जिल्हाधिकारी शर्मा हे सोमवारपर्यंत (दि.१९) सुट्टीवर आहेत. तसेच नाशिकचे अपर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे हेदेखील प्रकृती अस्वास्थ्यामुळे सध्या रजेवर आहे. त्यामुळे या दोन्ही प्रमुख अधिकाऱ्यांच्या अनुपस्थित जिल्ह्याची तात्पुरती जबाबदारी केकाण यांच्याकडे सोपविण्यात आली असल्याचे वृत्त आहे.

भालेकर मैदानात मॉकड्रिल

नाशिक । नागरी संरक्षण दलाच्या वतीने बी.डी. भालेकर मैदानात मॉकड्रिल घेण्यात आले. यावेळी विभागीय क्षेत्ररक्षक डॉ. मीनाक्षी गवळी, प्रा. योगेंद्र पाटील, शुभम क्षीरसागर, सहाय्यक उपनियंत्रक देवेंद्र बावस्कर, आकाशवाणी केंद्राचे सर्व अधिकारी स्टाफ नागरिक, तसेच केटीचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. काळे, मिलिंद पारनाईक, आदी उपस्थित होते.